पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, गुरुवार, ९ ऑक्टोबर २०२५

# ऋषीकेश कबनूरकर, शर्वरी कबनूरकर विजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विभागीय बुद्धिबळ स्पर्धा गडहिंग्लज येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात झाली. स्पर्धेत ११८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. पुरुष गटात ऋषीकेश कबनूरकर, तर महिलांत शर्वरी कबनूरकर यांनी अजिंक्यपद पटकाविले. सर्व खेळाडूंची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन दिनकरराव के. शिंदे स्मारक ट्रस्टचे सल्लागार महेश कोरी यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी विभागीय क्रीडा सचिव डॉ. नीलेश पाटील, शारीरिक संचालक सागर शिंदे उपस्थित होते. पंच म्हणून कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे माजी सचिव कृष्णात पाटील, शैलेश होनकट्टी यांनी काम पाहिले. संयोजन प्रा. शरद किल्लेदार व सहकाऱ्यांनी केले.

स्पर्धेचा अनुक्रमे निकाल असा : पुरुष गट : ऋषीकेश कबनूरकर (विवेकानंद कॉलेज), अमोल बागलकोट (न्यू कॉलेज), सारंग पाटील (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स), तन्मय पोवार (डीकेटीई कॉलेज), आदित्य सावळकर व राहुल लोखंडे (यू.जी., पी.जी. डिपार्टमेंट शिवाजी युनिव्हर्सिटी). महिला गट : शर्वरी कबनूरकर (के.आय.टी. कॉलेज), मयुरी सावळकर (सायबर कॉलेज), सृष्टी कुलकर्णी (विवेकानंद कॉलेज), वैष्णवी पाटील (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स), मुक्तांजली सावंत (विवेकानंद कॉलेज), दिशा पाटील (डीकेटीई कॉलेज).



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विभागीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन करताना महेश कोरी व प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे. यावेळी उपस्थित डॉ. नीलेश पाटील, शारीरिक संचालक सागर शिंदे, कृष्णात पाटील, शैलेश होनकट्टी आदी.**